निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २७७ वा.
गुरुवार :११ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# महाराष्ट्राला पंप स्टोरेज हब बनवण्याचे लक्ष्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर प्रतिनिधी**/ राज्याने पंप स्टोरेजमध्ये ७६,११५ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेपर्यंत मजल मारली आहे.महाराष्ट्राला पंप स्टोरेज हब बनवण्याचे लक्ष्य असून महाराष्ट्रात पंप स्टोरेज प्रकल्पांच्या उभारणीसाठी झालेल्या करारांमुळे ५,८०० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेची वाढ होणार आहे. या प्रकल्पात २३,८०० कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ११,५०० रोजगार निर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पश्चिम घाट उदंचन जलविद्युत प्रकल्प, कोयना टप्पा-६ उदंचन जलविद्युत प्रकल्प आणि सरोवर उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी जलसंपदा विभाग आणि जेएसडब्लू निओ एनर्जी लि., महाजेनको रिन्यूबल एनर्जी लि.व न्यु एशियन इन्फ्रा. डेव्हलपमेंट प्रा.लि. यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आले.

या कार्यक्रमास जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण खोरे) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आमदार सुरेश खाडे, आमदार नरेंद्र मेहता, आमदार चित्रा वाघ, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र पंप स्टोरेज क्षमतेच्या दृष्टीने देशात आघाडीवर आहे. आपल्याकडे पश्चिम घाट आणि मोठ्या धरणांची प्रणाली असल्याने पंप स्टोरेजसाठी अत्यंत अनुकूल पर्यावरण उपलब्ध आहे. केंद्र शासनाचे यात सहकार्य मिळत असून या प्रकल्पांना गती मिळणार आहे. नवीकरणीय ऊर्जेतील अस्थिरता संतुलित करण्यासाठी पंप स्टोरेज प्रकल्प मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरणार आहे. कमीत कमी वेळेत प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सर्व विभाग समन्वयाने काम करतील.

राज्यात उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी आतापर्यंत एकूण ५४ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या प्रकल्पामुळे ७६ हजार ११५ मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. त्यामुळे रुपये ४.०६ लाख कोटी इतकी गुंतवणूक व १.२५ लाख मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

**सामंजस्य करारातील उदंचन जलविद्युत प्रकल्पांची नावे व थोडक्यात माहिती**

**१. पश्चिम घाट उदंचन जलविद्युत प्रकल्प -**

या प्रकल्पासाठी जेएसडब्ल्यु निओ एनर्जी लिमिटेड हे गुंतवणूक करणार असून ता. भोर, जि. पुणे व ता. महाड, जि. रायगड येथे उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाची ५,२०० स्थापित क्षमता (मे.वॅ) असून १९,९५० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून ७,००० रोजगार निर्मिती होणार आहे. हा देशातील सर्वात मोठा प्रकल्प असणार आहे.






**२. कोयना टप्पा-६ उदंचन जलविद्युत प्रकल्प -**

या प्रकल्पासाठी महाजेनको रिन्युएबल एनर्जी लि. (एमआरईएल) हे गुंतवणूक करणार असून कोयना, ता.पाटण जि. सातारा येथे उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाची ४०० स्थापित क्षमता (मे.वॅ) असून २,८०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून २, ५०० रोजगार निर्मिती होणार आहे.

**३.सरोवर उदंचन जलविद्युत प्रकल्प -**

या प्रकल्पासाठी न्यु एशियन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्रा. लिमिटेड गुंतवणूक करणार असून हा प्रकल्प ता. अकोले, जिल्हा अहिल्यानगर येथे उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाची २०० स्थापित क्षमता (मे. वॅ) असून १,०५० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून २,००० रोजगार निर्मिती होणार आहे.

या तिन्ही प्रकल्पांची ५,८०० (मे. वॅ) स्थापित क्षमता असणार आहे. या प्रकल्पांसाठी २३,८०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या तिन्ही प्रकल्पाच्या माध्यमातून ११,५०० रोजगार निर्मिती होणार आहे.

राज्यात सार्वजानिक खासगी भागीदारीद्वारे (पीपीपी) उदंचन जलविद्युत प्रकल्प उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसन करण्याचे धोरण २० डिसेंबर २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. या धोरणास अनुसरून जेएसडब्लू निओ एनर्जी लि. महाजेनको रिन्यूबल एनर्जी लि.व न्यु एशियन इन्फ्रा. डेव्हलपमेंट प्रा.लि. या विकासकासोबत सामंजस्य करार करण्यात आले.

## सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन मोहिमेला राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते शुभारंभ

# तिन्ही दलांच्या सामर्थ्यामुळे राष्ट्राची प्रगती –राज्यपाल

**मुंबई** / देशात शांतीचे वातावरण असेल तरच समाजाची प्रगती शक्य होते. आपल्या देशाची तिन्ही सैन्य दलं अत्यंत सक्षम आहेत आणि त्यामुळेच आपले सैनिक व अधिकारी हे सर्वोच्च सन्मानास पात्र आहेत, असे गौरवोद्गार राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काढले.

सशस्त्र सेना ध्वज दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातर्फे आयोजित सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन मोहिमेचा लोकभवन, मुंबई येथे केला. यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. ध्वज निधी संकलनासाठी उत्तम कार्य केलेल्या अधिकाऱ्यांना राज्यपाल यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

राज्यपाल म्हणाले की, भारतीय सशस्त्र सेना ही देशाचे गौरव, प्रतिष्ठा आणि सन्मान यांचे प्रतीक आहे. सैनिक देशाच्या सीमांचे संरक्षण करतात, त्यासाठी त्यांना अपार धैर्याने उभे राहावे लागते. सीमा रक्षण करताना त्यांना वीरमरण येते किंवा अपंगत्व येते. अशा परिस्थितीत त्यांच्या पुनर्वसनाला साथ देणे हे प्रत्येक भारतीयाचे नैतिक कर्तव्य आहे, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. ते पुढे म्हणाले की, सशस्त्र दल फक्त सीमा राखत नाही, तर नैसर्गिक आपत्ती आणि आपत्कालीन प्रसंगी नागरिकांच्या मदतीसाठी तत्परतेने धावून येते. सैनिक असल्याचा नागरिकांना जो विश्वास आहे, तोच राष्ट्राच्या सुरक्षिततेचा पाया आहे. प्रमुख सेना अधिकारी, सेवेत असलेले आणि निवृत्त अधिकारी यांचे शौर्य आणि हिम्मत ही प्रेरणादायी आहे. सामान्य नागरिक सैन्याच्या प्रती असलेल्या योगदानासाठी उत्तरदायित्व ओळखतात आणि निधी संकलनासाठी सहभाग नोंदवतात. सैन्याच्या बलिदान, त्याग, शौर्यासाठी भारतीय नतमस्तक होतात. असे गौरवोद्गारही राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी तिन्ही दलांच्या सन्मानार्थ काढले.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार म्हणाले की, सशस्त्र सेना ध्वज दिनानिमित्त संकलित निधी शहीद सैनिकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत, लढाईत जखमी/अपंग झालेल्या सैनिकांचे पुनर्वसन, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणकारी योजना, सैनिकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मदत, सैनिक कल्याण बोर्डाच्या विविध उपक्रमांना निधी देण्यासाठी ध्वज संकलन केले जाते.

निधी संकलनासाठी योगदान दिलेल्या सर्व सैनिक, सैनिकी कुटुंब, नागरिक, शाळा, संस्था यांचे मुंबई शहरचे जिल्हाधिकारी अंचल गोयल यांनी आभार मानले. यावेळी निधी संकलनासाठी उत्कृष्ट कार्य केलेल्या कोकण विभागाचे आयुक्त विजय सूर्यवंशी, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुंबई शहरचे जिल्हाधिकारी अंचल गोयल, छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज अशीया, अमरावतीचे जिल्हाधिकारी अशीष येरेकर, सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर, उपविभागीय अधिकारी प्रशांत डागे, जिल्हा प्रकल्प अधिकारी संजयकुमार शिंदे, उपआयुक्त, एमसीजीएम (कांदिवली विभाग) संजय खुराडे, तहसीलदार, बोरिवली इरेश चापलवार, तहसिलदार अंधेरी स्नेहलता स्वामी, प्रशासन अधिकारी किसन केकरे, शिक्षण निरीक्षक, उत्तर विभाग (चेंबूर) मुश्ताक शेख, शिक्षण निरीक्षक, पश्चिम विभाग (जोगेश्वरी) संजय जावीर, संयुक्त जिल्हा निबंधक, मुंबई उपनगर रमेश पगार, अधीक्षक, उत्पादन शुल्क निलेश सांगडे, उपआयुक्त, जीएसटी विभाग माझगाव संतोषकुमार राजपूत, प्रादेशिक परिवहन अधिकारी भारत काळसकर,



संचालक, अन्न व नागरी पुरवठा नियंत्रक चंद्रकांत डांगे, जिल्हा उपनिबंधक, सहकार विभाग नितीन काळे, सहाय्यक आयुक्त, सामाजिक कल्याण रविकिरण पाटील, संयुक्त जिल्हा निबंधक भरत गरुड, शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग वैशाली वीर यांना राज्यपालांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांच्य वतीने मेजर आनंद पाठरकर यांनी सन्मान स्वीकारला.

कार्यक्रमास व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन, फ्लॅग ऑफिसर-इन-चीफ, वेस्टर्न कमांड, भारतीय नौदल, लेफ्टनंट जनरल डी.एस. कुशवाहा, जनरल ऑफिसर कमांडिंग, महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा क्षेत्र, एअर व्हाइस मार्शल प्रशांत वडोदकर, एअर ऑफिसर कमांडिंग, मेरीटाईम एअर ऑपरेशन्स, सचिव, विशेष तपास अधिकारी-२, सामान्य प्रशासन विभाग पंकज कुमार, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सैनिक कल्याण विभागाचे संचालक, कर्नल दीपक ठोंगे (निवृत्त), मुंबई शहर आणि मुंबई उपनगरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर प्रांजल जाधव, विविध देणगीदार संस्था, शाळा, महानगरपालिका, सरकारी विभाग आणि खाजगी क्षेत्रातील संस्थांचे प्रतिनिधी आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## गुटखा उत्पादन आणि विक्रेत्यांवर‘मकोका’ लागू होणार

## ‘एफडीए’मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

**मुंबई**/ गुटखा उत्पादन आणि विक्रेत्यांची गुन्हेगारी साखळी तोडण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मकोका लागू करण्याची घोषणा विधिमंडळ अधिवेशनात केली



असून यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या (एफडीए) कारवाईसाठी बळकटी येणार असल्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे. याबद्दल मंत्री झिरवाळ यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत.

परराज्यातून अवैध मार्गाने राज्यात मोठ्या प्रमाणात गुटखा आणि सुगंधी सुपारी आणली जाते. यावर ‘ एफडीए’च्या जप्ती आणि फौजदारी कारवाईनंतरही विक्री होत असल्याने या गुन्हेगारी साखळीला रोखण्यासाठी ‘महाराष्ट्र संघटित गुन्हे प्रतिबंधक कायदा’ (मकोका) अंतर्गत कारवाईचा निर्णय घेण्याची प्रक्रिया अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पातळीवर सुरू असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मकोका कारवाई करण्याची घोषणा करून विभागाच्या प्रस्तावाचे समर्थन केले आहे, असे मंत्री झिरवाळ म्हणाले.

मकोका कारवाईची घोषणा करताना गुटखा व अंमली पदार्थांवरील कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी कठोर विशेष कायदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ‘महाराष्ट्र संघटित गुन्हे प्रतिबंधक कायदा’ (मकोका) अंतर्गत कारवाईचा निर्णय घेतला जाईल,असे मुख्यमंत्री यांनी विधिमंडळ अधिवेशनात स्पष्ट केले.

गुटखा, सुगंधी पान मसाला यावर राज्यात बंदी असूनही शाळा महाविद्यालयांच्या व परिसरातील दुकानांत गुटखा उत्पादन व विक्रेत्यांकडून नियमबाह्य विक्री केली जाते. गुटखा विक्री कारवाई अधीक प्रभावी व्हावी यासाठी गुटख्यासह सुगंधी सुपारी विक्रेत्यांनाही मकोकाच्या कक्षेत आणले जाणार आहे, तसा प्रस्तावच विधि व न्याय विभागाला पाठवणार असल्याची माहिती या पूर्वी अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली आहे.

# गेटवे ऑफ इंडिया येथे नौसेना दिनानिमित्त राज्यपालांच्या उपस्थितीत ‘बिटींग रिट्रीट’







**मुंबई** / भारतीय नौसेना दिनानिमित्त भारतीय नौदलाच्या पश्चिम विभाग मुख्यालयातर्फे गेटवे ऑफ इंडिया येथे आयोजित ‘बिटींग रिट्रीट’ आणि ‘टॅटू सेरेमनी’चा भव्य समारंभ राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. देशाची समुद्री शक्ती, शिस्त, संस्कृती आणि परंपरेचा अप्रतिम संगम अनुभवायला मिळालेल्या या समारंभाने नौदलाच्या शौर्यपरंपरेला आणि राष्ट्रीय अभिमानाला उजाळा दिला.

या प्रसंगी नौदलाच्या हेलिकॉप्टर्सचा रोमहर्षक फ्लाय-पास्ट, नेव्हल सेंट्रल बँडचे आकर्षक सादरीकरण, कुठल्याही मौखिक आदेशांशिवाय सातत्यपूर्ण कवायत तसेच सी कॅडेट कोअरच्या लहान मुलींनी सादर केलेला ‘हॉर्नपाईप सेलर्स डान्स’ यांना उपस्थित प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. नौदल दिनाच्या औचित्याने समुद्रातील जहाजांवर आकर्षक रोषणाईही करण्यात आली होती.

१९७१ च्या भारत-पाक युद्धादरम्यान ४ डिसेंबर रोजी भारतीय नौदलाने कराची बंदरावर केलेल्या निर्णायक हल्ल्यातील शौर्याच्या स्मृतीनिमित्त तसेच नौदलाच्या शहीद जवानांना आदरांजली वाहण्यासाठी दरवर्षी ४ डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो.

समारंभास नौदलाच्या पश्चिम कमानचे मुख्य ध्वज अधिकारी व्हाईस डमिरल कृष्णा स्वामीनाथन, नौदलातील वरिष्ठ अधिकारी, माजी अधिकारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी नौदलाच्या जवानांनी कौशल्यपूर्ण अनोख्या परंपरा सादर केल्या. विशेष आकर्षण ठरलेल्या आयएनएस शिकरा हेलिकॉप्टरच्या फ्लाय-पास्ट व ऑपरेशनल डेमोने भारतीय नौदलाची ताकद आणि अत्याधुनिक तांत्रिक क्षमता स्पष्टपणे दिसून आली. या भव्य आयोजनातून भारतीय नौदलाने केवळ आपल्या ऐतिहासिक परंपरा जपण्याचा संदेश दिला नाही, तर नव्या पिढीमध्ये राष्ट्रीय अभिमान, शिस्त आणि नौदलाच्या शौर्यकथांबद्दल प्रेरणा निर्माण करण्याचे कार्यही केले.

**राज्यपालांची ‘नेव्ही हाऊस’ येथे मान्यवरांशी भेट**

गेटवेवरील कार्यक्रमानंतर राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी ‘नेव्ही हाऊस’ येथे आयोजित केलेल्या स्वागत समारंभ व चहापानाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून निमंत्रित नौदल अधिकारी व माजी अधिकारी तसेच गणमान्य व्यक्तींना नौसेना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी व्हाईस डमिरल कृष्णा स्वामीनाथन यांनी राज्यपालांना निमंत्रित मान्यवरांचा परिचय करून दिला.

# अभिनयातील भीष्माचार्य दिलीपकुमार

ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांची आज जयंती. ११ डिसेंबर १९२२ रोजी दिलीपकुमार यांचा जन्म पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कॅंटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कॅंटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बारा-शे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल - ए - आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान - ए - इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. ७ जुलै २०२१ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचेच नाही तर देशाचे मोठे नुकसान झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनयातील भीष्माचार्य, अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना विनम्र अभिवादन!

# शिक्षेची तरतूद लहानपणापासूनच असावी?

आजकाल घराघरात संवाद चाललेले दिसतात. म्हटलं जातं की आजची मुलं आईवडीलांना घाबरतच नाहीत. उलट आपल्याला मुलांनाच घाबरावं लागतं. जरी काही आईवडील मुलांना धाक म्हणून मारतही असतील तरी. त्याचं कारण काय असावं? पुर्वी मात्र तसं नव्हतं. पुर्वी मुलं आईवडीलांना घाबरायचे. मग ती मुलं कितीही मोठी झाली असली तरी. तरी ती आज्ञेत वागायची आईवडीलांच्या. त्यातच आईवडील म्हातारे जरी झाले तरी ती मुलं आईवडीलांची सेवा करायची. त्याचं कारण काय असावं? दोन प्रश्न व दोघांची उत्तरं एकच आहेत. ते म्हणजे शिक्षक त्यांना करीत नसलेली शिक्षा. अलिकडील काळात विद्यार्थी हे शिक्षकांनाही घाबरत नाहीत. कारण शिक्षक हे विद्यार्थ्यांना शिक्षाच करीत नाहीत. त्याचंही एक कारण म्हणजे शिक्षकांनी एखाद्या विद्यार्थ्यास शिक्षा केल्यास त्यांच्या आईवडीलांचे शिक्षकांना दमदाटी करायला येणे.*

आज शिक्षण व्यवस्थेकडे पाहिल्यास शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवितांना त्यांना मारु नये. रागवू नये, काही अपशब्द बोलू नये. अपशब्द बोलल्यास वा रागावल्यास विद्यार्थ्यांचा अपमान होतो. हा नियम आहे. त्यातच आजच्या काळात विद्यार्थी जेव्हा लहान असतात. त्यांना शाळेतील शिक्षकही मायेनं वागवतात. परंतु मुलं मायेनं वागतील तेव्हा ना. काही काही मुलांना कितीही मायेनं वागवलं तरी ती मुलं मायेनं चांगली बनत नाहीत. ती डोक्यावर चढल्यासारखी चढतात. ती मुलं आजच्या काळात ना पेन शाळेत आणत. ना पेन्सील त्यांचेजवळ असत. ना ती मुलं अभ्यास करुन शाळेत येत. त्यातच एखाद्यावेळेस एखाद्या मुलांना शिक्षक रागावल्यास जेव्हा त्यांचे आईवडील शिक्षकांना दमदाटी द्यायला येतात. तेव्हा विद्यार्थ्यांना आनंद होतो. त्यातच इतर विद्यार्थ्यांनाही आनंद होतो. त्यानंतर शिक्षक अशा पालकांच्या वर्तनानं कोणत्याच विद्यार्थ्यांवर रागवत नाही. शिका नाहीतर नको शिका. अशी कृती जोपासतात. ज्यातून ती मुलं तर एवढी उद्धटपणे वागायला लागतात की विचारता सोय नाही. हेच वात्रट वागणं इतर मुलांच्या जीवन घडणीवर परिणाम करुन जात असतं. पालकांच्या अशा वागण्यानं व शिक्षकांना दमदाटी केल्यानं शिक्षक त्यानंतर मुलांवर रागवत नाहीत. त्यातच ती मुलं त्यानंतर घरीही आपल्या आईवडीलांना घाबरत नाहीत. त्यांनाही काहीबाही बोलतात. कारण शिक्षेची शाळेतील भीती कमी झालेली असते. तद्वतच ती मुलं पुढे गुन्हेगारी जगताकडे वळतात व आपल्या आयुष्याचं नुकसान करुन बसतात. त्यातच जे गुन्हे घडतात. ते गुन्हे क्षम्य नसल्यानं न्यायालयामार्फत ज्या शिक्षा होतात. त्यात एक शिक्षा फाशीचीही असतेच.

अलिकडील काळात गुन्ह्यांच्या संख्येत वाढ झालेली आहे. काल शिक्षकांना सांगीन असा धाक असायचा व मुलंही त्याच भीतीनं घरी, दारी वाईट कृत्य करायचे नाहीत. हे चुकावर आपण वर्तन सुधरविण्याची कृती अगदी लहानपणापासूनच चालायची. ज्यातून संस्कार होत असत. मात्र आता तसं नाही. आता लहानपणापासून शिक्षेच्या वातावरणात न जगणारी मुलं मोठी झाल्यानंतरही त्यांना शिक्षेचं महत्व कळत नाही व ती गुन्हे करतात. लहान गुन्हे नाहीत तर मोठेही गुन्हे करतात. ज्यातून जे गुन्हे व्हायला नको, ते गुन्हे होतात.

शिक्षेबद्दल सांगायचं झाल्यास शिक्षेचंही मानवी जीवनात अतिशय महत्व आहे. शिक्षा जर झाली नाही तर झालेल्या चुका ह्या वारंवार होतच राहतील. त्या सुधारता येणार नाहीत. हो, म्हटलं आणि मानलं जातं की प्रेमानं जग जिंकता येतं. परंतु प्रेमानं सगळंच काही घडवता येत नाही. त्यासाठी शिक्षा ही महत्वाची भुमिका बजावत असते. तसं पाहिल्यास शिक्षा ही लहानपणापासूनच विद्यार्थी दशेपासून असायलाच हवी. कारण त्यातून विद्यार्थ्यांना वळण लावता येतं. विद्यार्थ्यांचं आयुष्य फुलवता येतं. विद्यार्थ्यांना जगण्याचं व तेही चांगलं जगण्याचं महत्व सांगता येतं. विशेष म्हणजे आपण पशुपक्षी व प्राणीमात्राही पाहिले आहेतच. प्राणीमात्रामधील साध्या मुंगींचं उदाहरण घेतलं तर ती मुंगीदेखील एका सरळ रेषेत रांगेत चालते. कोण शिकविते तिला रांगेत चालणं. यावर कोणी म्हणतात की पुढील मुंगी ही काहीतरी स्राव सोडते. ज्यातून ती रांगेत चालते. परंतु हे जरी खरं असलं तरी तो स्राव हा भटकलेल्या मुंगीसाठी असतो. रांगेत चालणाऱ्या मुंगीसाठी नसतोच. सीतेनं जसं अपहरण होताच रामाला रस्ता सापडावा यासाठी आपलं एकएक वस्त्र वा दागीणा सोडला तसा. रांगेत चालणाऱ्या मुंगीला रांगेत चालावं हे शिक्षण मुंगीनं दिलेली असते. असं न चालल्यास इतर मुंग्या त्या मुंग्यांना वाळीत टाकत असतात. हेच कृत्य इतरही प्राणीमात्रात घडते. म्हणतात की माणसाचा हात पाळलेले पक्षी सोडून ज्या पक्षांना लागतो. त्या पक्षांना लोकं मारुनच टाकत असतात. ही शिक्षाच असते, त्यांना प्राणीमात्रांनी दिलेली. ज्या प्राणीमात्रानं ती शिक्षा इतर त्यांच्याच बिरादरीतील पशुपक्षांना सुधरविण्यासाठी दिलेली असते.

शिक्षेबद्दल आणखी सांगायचं झाल्यास निसर्गानंच शिक्षेचे अधिकार आपल्याला दिलेले आहेत. साध्या सापाचं उदाहरण घेतलं तर साप हा जाणूनबुजून आपल्या वाट्याला जात नाही. हं, त्यांच्या वाटेला गेल्यावर अर्थात आपला पाय त्याचेवर पडल्यावर तो चावा घेतो. ही शिक्षाच असते मानवाला त्यानं दिलेली. माणसानं सावध चालावं. तशी चूक करु नये यासाठी दिलेली. त्यानंतर माणूस सुधारतोही व तो त्यानंतर चालतांना जपून चालतो. तो सापच नाही तर इतर प्राण्यांच्याही वाट्याला जात नाही. त्यातच झाडावरच्या मुंग्या, झाड तोडतांना चावतात. जी शिक्षाच असते, झाड तोडू नका हे सांगणारी. त्यानंतर माणूस मुंग्यांच्या चाव्याच्या भीतीनं ते झाड तोडत नाही. आता शिक्षेची पळवाट म्हणून लोकं आधी मुंगी पावडर टाकून आधी मुंग्या मारतात. ही पळवाट झाली. त्या प्राण्यांपासून वाचण्यासाठी. ते प्राणी आहेत म्हणून आपण मार्ग काढू शकतो. परंतु आपली हिंसेची व झाडं तोडण्याची कृती थांबवत नाही. ती कृती सुधारण्यासाठी असते. याचा परिणाम आज जाणवतच आहे. आपण आपली झाड तोडण्याची कृती चुकीची आहे, हे समजून न घेतल्यानं आता जंगलं कमी झालीत व बिबट्यांनी मानवी वस्तीचा आधार घेतलेला आहे.

महत्वपुर्ण बाब ही की आज आपण आपल्या कृतीनं मुंग्यासारख्या प्राण्यांवर विषप्रयोग करुन झाड तोडू शकतो. मात्र मानवी जीवनात तसं नाही. आपली जर चूक असेल तर तो गुन्हाच ठरतो. त्यासाठी मृत्यूदंडशिवाय दुसरा पर्यायच नसतो. अन् नसायलाही हवं. कारण चुकीवर माफी जरी दिली. तरी काही काही लोकं हे कुत्र्याच्या शेपटीगत असतात. त्यांना कितीही शिक्षा केली तरी त्यांची कृती सुधारत नाही. ज्याप्रमाणे कुत्र्याची शेपूट वाकडीच राहते. कितीही प्रयत्न करुन ती सरळ करण्याचा प्रयत्न केला तरीही. त्यासाठी शिक्षा ही महत्त्वपूर्ण ठरते.

विशेष सांगायचं झाल्यास शिक्षा ही महत्त्वपूर्ण असून ती लहानपणापासूनच महत्वाची आहे. जर विद्यार्थ्यांना वळण लावायचं असेल तर...... जर विद्यार्थ्यांनाच नाही तर आपल्या मुलांना लहानपणापासूनच होणाऱ्या चुकांवर किरकोळ स्वरुपाच्या शिक्षा केल्या गेल्या तर आपल्याला शिक्षा होईल या धाकानं मुलं वाईट कृती करणार नाहीत. त्यातच त्यांचं वर्तन सुधरु शकते. तसेच त्यांच्यात संस्कारही फुलू शकतात. एवढंच नाही तर तीच मुलं मोठीही झाली तरीही ते शिक्षेच्या धाकानं कोणतंही वागणं वात्रट स्वरुपाचं ठेवू शकत नाहीत. ज्यातून सुसंस्कार वाढीस लागतात. जे सुसंस्कार त्यांच्या चांगलं जीवन जगण्याच्या कामात येतात. एवढंच नाहि तर तेच सुसंस्कार पुढं देशाच्याही कामात येतात. हे तेवढंच खरं.

**- अंकुश शिंगाडे**
**नागपूर**

# देशात दिवसेंदिवस अग्निसुरक्षेची पायमल्ली होत आहे; हे गोव्यातील अग्नी कांडवरुन स्पष्ट .....

उत्तर गोव्यातील पणजी पासून २५ किमी अंतरावर असलेल्या अर्पोरा येथील बर्च बाय रोमियो लेनया गर्दीने तुडुंब भरलेल्या नाइट क्लबला शनिवारी मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला,तर १६ जण गंभीररित्या जखमी झाले.डान्स फ्लोअरवर फोडलेल्या फटाक्यांमुळे ही आग लागल्याचे सांगितले जाते आणि ही आग तेथील व्यवस्थापनेच्या हलगर्जीपणामुळे झाल्याचे सिद्ध होते.डान्स फ्लोअरवर आग लागली तेव्हा तिथे किमान १०० जण उपस्थित असल्याचे सांगितले जाते.यातील काहीजणांनी स्वतःला वाचविण्याच्या प्रयत्नात स्वयंपाकघराकडे धाव घेतली आणि घात झाला ही भयावह घटना पाहून अंगावर शहारे येतात. आपण देशातील अनेक राज्यांमध्ये खाजगी स्थळी व शासकीय स्थळी मोठमोठे अग्नी कांड होतांना पहातो तरीही राज्य सरकारे किंवा केंद्र सरकार अग्नी सुरक्षेच्या बाबतीत अजुन पर्यंत सतर्क नसल्याचे स्पष्ट दिसून येते.गोव्यातील नाइट क्लबमध्ये सरकारने घालून दिलेली संपूर्ण नियमावलीची पायमल्ली करून क्लब मालक,भागीदार, व्यवस्थापक आणि इतर व्यवस्थापकीय कर्मचारी हे क्लब चालवीत होते ही बाब स्पष्ट होते.

याच अनुषंगाने सरकारने मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. कारण नाइट क्लब नियमांची पायमल्ली करून चालवित असल्याचे उघडकीस आले आहे.नियमांची पायमल्ली फक्त गोव्यातच नाही तर देशातील इतरही भागात किंवा राज्यात मोठ्या प्रमाणात दिसून येते.

देशात अनेक अग्नी तांडव होतांना आपण पहातो.परंतु अग्नी सुरक्षेच्या दृष्टीने अजुनही आपल्या जवळ अत्याधुनिक सुविधा नाहीत किंवा पाहिजे त्या प्रमाणात कर्मचारी नसल्याचे सुध्दा दिसून येते.गोव्यातील नाइट क्लबमध्ये लागलेली आग १०० टक्के रोखता आली असती, जर क्लब मालक किंवा तेथील व्यवस्थापनाने अग्नि सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले असते तर.आज क्लब मालकाच्या व तेथील व्यवस्थापनेच्या चुकीमुळे २५ लोकांचा बळी गेला व १६ जण गंभीररित्या जखमी झाले.यात क्लबमधील स्वयंपाकघरात काम करणारे कामगार असल्याचे सांगितले जाते.ही अत्यंत दुर्दैवी व गंभीर बाब आहे.यात प्रशासनाचीही चुक राहु शकते कारण अग्नि सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन विभागाने दर महिन्याला क्लबचे ऑडिट घ्यायला हवे होते.परंतु प्रशासनाचे दुर्लक्ष व क्लब मालकाची आणि व्यवस्थापनाची मनमानी यामुळेच क्लबमध्ये आग लागली व या अग्नी तांडवात निरअपराधांचा बळी गेला त्यामुळे या घटनेला क्लब मालक व व्यवस्थापन जेवढे जबाबदार आहेत तेवढेच जबाबदार गोवा प्रशासन आहे असे मला वाटते. देशातील अनेक प्रशासकीय इमारती, हॉस्पिटलमध्ये आपण आगी लागलेल्या पाहिल्यात यात अनेकांचा किंवा चिमुकल्यांचा बळी सुध्दा गेला तरीही देशातील राज्य सरकारे अग्नी सुरक्षेच्या बाबतीत सतर्क झाल्याचे दिसून येत नाही ही देशाची व राज्यांची शोकांतिका म्हणावी लागेल.

ज्या ठिकाणी सुरक्षेचे उपाय नाही त्याठिकाणी अचानक आग लागणे ही वेगळी बाब आहे.परंतु ज्या ठिकाणी आग लागु शकते आणि त्यावर नियंत्रणाचे उपाय कोणते याची जाणीव आपणाला असतांना सुध्दा आगडोंब निर्माण होतो हे तर आश्चर्यच म्हणावे लागेल.हा क्लब अग्नि सुरक्षेचे संपूर्ण नियम धाब्यावर ठेवून क्लब मालक सौरभ लुथरा चालवीत होता.असेही सांगितले जाते की अर्पोरा येथील बर्च बाय रोमियो लेन असलेल्या या क्लब जवळ अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्रही नव्हते.

त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की इतके वर्षांपासून सुरू असलेल्या या क्लब जवळ अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र का नाही याची चौकशी गोवा प्रशासनाने आतापर्यंत का केली नाही? असाही प्रश्न उपस्थित होतो.या क्लबच्या अग्नितांडवाला मालक व व्यवस्थापन जितके जबाबदार आहेत तेवढेच जबाबदार गोवा प्रशासन सुध्दा आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.कारण अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र नसने आणि गोवा प्रशासन डोळे बंद करून क्लब सुरू असलेला पहात आहे ही तर प्रशासनाची मोठी चुकीच म्हणावी लागेल. क्लबवरील सरकारची कठोर कारवाई पहाता क्लब मालक सौरभ लुथरा व त्यांच्या साथीदारांनी विदेशात पलायन केल्याचे सांगितले जाते. त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, अग्नी तांडव होताच हे फरार कसे काय झाले? याचीही चौकशी सरकारने केली पाहिजे.असेही सांगितले जाते की गौरव लुथरा व सौरभ लुथराच्या क्लबचे अवैध जाळे देशातील अनेक राज्यांमध्ये असल्याचे सांगितले जाते त्यावर सरकार वेळ न करता बुलडोझर ऍक्शन घेत ही अत्यंत चांगली गोष्ट आहे याचे मनापासून स्वागत.परंतु देशातील राज्य सरकारांनी अशा गैर जबाबदार क्लब किंवा प्रशासकीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांच्या वेळीच मुसक्या आवळल्या तर अशाप्रकारचा आगडोंब टाळता येईल.

गोवा हे पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी नामांकित राज्य आहे. त्यामुळे बर्च बाय रोमियो लेननाइट क्लबची भीषण अग्नी दुर्घटना पहाता,पुढे चालून अशाप्रकारच्या भयावह दुर्घटना होणार नाही याची गोवा प्रशासनाने व सरकारने जाणीवपूर्वक काळजी घेतली पाहिजे. गोवा सरकारला कसिनो उद्योगापासुन मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होतो.परंतु आता प्रश्न उपस्थित होतो की बर्च बाय रोमियो लेन नाइट क्लबच्या दुर्घटनेचा कसिनो उद्योगावर विपरीत परिणाम तर होणार नाही याची भिती वाटत आहे.त्यामुळे सरकारचे कसिनोकडे लक्ष लागले आहे.मांडवीत सध्या सहा कसिनो जहाज कार्यरत असल्याचे सांगितले जाते.

क्लबमधील अग्नी तांडव पहाता,कसिनो जहाजांमधुन आणीबाणीच्या वेळी लोकांना बाहेर काढणे हा सध्याच्या परिस्थितीत चिंतेचा विषय बनला आहे.कारण आगीसारखी दुर्घटना घडल्यास लोकांना जिवाच्या आकांताने मांडवी नदीत उड्या माराव्या लागतील आणि ही जिवीत हाणी मोठी होवू शकते. त्यामुळे वाढत्या आगीच्या घटना पहाता सरकार सतर्क रहाने गरजेचे आहे. ज्या दुर्घटना आपण रोखू शकतो अशा घटना क्लब मालक किंवा इतर व्यावसायिकांनी स्वतःहुन रोखल्याच पाहिजे यासाठी सतर्कता बाळगुन नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.त्याचप्रमाणे सरकारने घालून दिलेल्या नियमांचे पालन होत आहे किंवा नाही हे पहाने स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य आहे.त्याचप्रमाणे क्लब मालक किंवा इतर कोणतेही खाजगी किंवा शासकीय स्थळे असो अग्नी सुरक्षेची पायमल्ली होणार नाही याची जबाबदारी सर्वांनीच घ्यायला हवी.तेव्हाच आपल्याला आगीच्या घटना रोखता येईल.आज देशातील अनेक शहरांमध्ये मोठमोठ्या गगनचुंबी इमारती उभ्या आहेत किंवा होत आहेत. परंतु येवढ्या उंचीवरील आग विझविण्यासाठी आपल्याजवळ अजून पर्यंत अत्याधुनिक साधने उपलब्ध नाहीत सोबतच अग्निशमन विभागात मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांचा तुटवडा असल्याने अग्निशमन विभागाला अनेक कठीण समस्यांचा सामना सुध्दा करावा लागतो.

या संपूर्ण घटनांचे आकलन करून देशातील संपूर्ण राज्य सरकारांनी कठोर नियमावली तयार करून अग्नी सुरक्षांची तयारी करावी.कारण छोट्याशा चुकीमुळे किंवा हलगर्जीपणामुळे मोठ्या दुर्घटना केव्हाही ओढावु शकते याला नाकारता येत नाही.त्यामुळे पर्यटकांनी सतर्क रहावे,सुरक्षित रहावे आणि येणाऱ्या दुर्घटना टाळाव्या.जय हिंद.

**-लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार ) , नागपूर.**

# जरंडीत आर ओ फिल्टर व पिठगिरणीचे उद्धाटन;-महिला बचत गटाकडे दिली जबाबदारी, ग्रामपंचायतीचा पुढाकार



**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव / प्रतिनिधी** / महिलांना आर्थिक बळकटीकरण देण्यासाठी जरंडी ग्रामपंचायतीचा वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत उत्पन्न वाढीसाठी मंगळवारी (ता.०९) शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी आर ओ प्लॅन्टचे व पिठगिरणीचे उद्धाटन सरपंच स्वातीताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले ग्रामस्थाना नाममात्र पिठगिरणीतुन दळण करून देण्यात येणार असल्याचे सरपंच स्वातीताई पाटील यांनी सांगितले

दरम्यान ग्रामस्थांचे आरोग्य सदृढ व्हावे यासाठी वीस लिटर शुद्धपाणी नाममात्र शुल्क आकारून ग्रामस्थांना पुरविण्यात येणार आहे आर ओ प्लॅन्ट आणि पिठगिरणी चालविण्यासाठी गावातील जय भवानी बचत गटाच्या अध्यक्ष धृपताबाई सोनवणे यांना दिली आहे .

यातून महिला सक्षमीकरण होण्यासाठी बचत गटाकडे ही कामगिरी सोपविली असल्याचे ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांनी सांगितले यावेळी उपसरपंच संजय पाटील,विस्तार अधिकारी सुनील राकडे, दिलीप पाटील,अमृत राठोड, माजी पंचायत समितीचे सदस्य संजीवन सोनवणे, मधुकर पाटील,मधुकर सोनवणे, सिद्धार्थ मोरे, श्रीराम पाटील,भिवा चव्हाण, माधव मोहिते,सोयगावचे माजी उपनगराध्यक्ष योगेश पाटील,शिवसेना महिला आघाडीच्या धृपता बाई सोनवणे, आदींची उपस्थिती होती सतिष बाविस्कर, संतोष पाटील,भास्कर निकम् आदींनी पुढाकार घेतला होता.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पाल्यांना रोजगारासाठी कौशल्य प्रशिक्षण द्यावे -जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ जिल्ह्यात आत्महत्याग्रस्त शेतकरी बाधवाच्या कुटुंबातील मुला, मुलींना किमान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले .

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यताविभागाची जिल्हा कार्यकारणी समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जिल्हा कौशल्य कौशल्य ,रोजगार उद्योजकता विभागाचे सहाय्यकआयुक्त राजू वाकोडे, शिक्षणाधिकारी माध्यमिकच्या अश्विनी लाठकर, शासकीय तंत्रनिकेतनचे उपसंचालक प्रदीप दुर्गे,प्राचार्य. अभिजीत आलटे,,सिपेट प्रशिक्षण संस्थाचे व्यवस्थापक आर जीवन राम, , इंडो जर्मन टूल्स कंपनी व्यवस्थापक जयेश बागुल, छत्रपती शाहू महाराज महाविद्यालयाचे कमलाकर कदम, अटल इंक्युबेशन सेंटरशेख नवीद, देवगिरी शासकीय तंत्र निकेतन संस्था एस, जी .गोस्वामी यासह विविध प्रशिक्षण संस्थांच्या समन्वयक आणि प्राचार्य यांची उपस्थिती होती.

जिल्हास्तरीय किमान कौशल विकास कार्यक्रमांतर्गत देण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण उपक्रमामध्ये जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील तरुण, तरुणींना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करावे. तसेच जिल्ह्यातील सैन्य दलातील निवृत्त झालेल्या माजी सैनिक आणि त्यांच्या पाल्यांनाही प्रशिक्षणास प्राधान्य देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज बैठकीत दिले.

कौशल्य, रोजगार ,उद्योजकता व नावीन्यता जिल्हा कार्यकारणी समितीच्या अंतर्गत असणाऱ्या विविध प्रशिक्षण संस्था ,शासकीय संस्था, अर्ध शासकीय आणि खाजगी कंपन्यांच्या प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण व्हावे. आगामी काळातील पाच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक कंपन्यांची गुंतवणूक आणि निर्मिती जिल्ह्यामध्ये होत असून या कंपन्यांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देऊन जिल्ह्याचा रोजगार निर्मितीमधील सहभाग मोठ्या प्रमाणात असावा



यासाठीचे प्रशिक्षण वर्ग आणि त्याचे आयोजन , नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज संबंधित प्रशिक्षण संस्था आणि जिल्हा कौशल्य विकास विभागाला दिले.

जिल्हातील कौशल्य विकासाच्या अंतर्गत एकत्रित रोजगार निर्मितीसाठी सर्व संस्थाने समन्वयातून विविध प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे नियोजन करावे. ज्या प्रशिक्षणार्थींची जास्त गरज औद्योगिक क्षेत्रांना असते त्याला प्राधान्य देण्यात यावे .कौशल्य विकास योजना अंतर्गत जागतिक बँकेचा दक्ष हा एक प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्येही मोठ्या प्रमाणात तरुणांनी सहभाग घ्यावा. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ,प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान, किमान कौशल्य विकास कार्यक्रम, आर्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र याच्या अंतर्गतही तरुणांना प्रशिक्षण दिले जाते. शासकीय तंत्रनिकेतन आणि विविध कंपन्यांचे स्वायत्त असलेल्या प्रशिक्षण संस्थांमधून तरुणांना मोठ्या प्रमाणात विविध कौशल्य आधारित प्रशिक्षणाची निवड आणि संधी उपलब्ध करून दिली जाते. यामध्ये गरजू आणि बेरोजगार तरुण तरुणींना प्रशिक्षण देण्यात यावे. जिल्ह्यामध्ये या सर्व संस्थांनी अत्यावश्यक असणाऱ्या कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी असलेले अभ्यासक्रम आगामी पाच वर्षाच्या अनुषंगाने निवड करून तयार करावेत .व यामध्ये आवश्यक असल्यास काही नवीन अभ्यासक्रमाचा ही समावेश करावा असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले.

## संक्षिप्त

### राष्ट्रीय लोक अदालत शनिवारी (दि.१३)

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्याआदेशानुसार राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे शनिवार दि.१३ रोजी राष्ट्रीय लोकअदालत चे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपापली प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने व तडजोडीने मिटवावीत, असे आवाहन राज्यविधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्यामार्फत करण्यात आले आहे.
न्यायालयात प्रलंबित प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे (उदा.चेक बाऊन्स, बँक वसुली, वीज / पाणी बिल) लवकर व सामोपचाराने निकाली काढून न्यायालयीन प्रक्रियेवरील ताण कमी करणे, तसेच पक्षकारांना त्वरित दिलासा देण्यासाठी लोक अदालत महत्वपूर्ण ठरते.ज्याची प्रलंबित प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत, त्यांनी लोक अदालतीमध्ये प्रकरण ठेवण्यासाठी संबंधित न्यायालयात अर्ज करावा. दाखलपूर्व प्रकरणांसाठी न्यायालयीन प्रक्रियेत दाखल न झालेल्या वादांसाठी पक्षकारांनी नजीकच्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करावा.
लोक अदालतीमध्ये न्यायाधीश, तज्ज्ञ वकील व सामाजिक कार्यकर्ते यांच्या मंडळाद्वारे मार्गदर्शन आणि मदत मिळते तीही कोणतीही न्यायालयीन फी भरावी लागत नाही तसेच कोर्ट फी परत दिली जाते. वलोकन्यायालयात यशस्वीरित्या निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये नियमानुसार भरलेली कोर्ट फीची रक्कम पक्षकारांना परत मिळते. लोकन्यायालयाचा निवाडा, अंतिम असतो व त्याविरुद्ध अपील करता येत नाही. निवाड्याची अंमलबजावणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे होते. साक्षी-पुरावा, उलटतपासणी आणि दीर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात. तरी पक्षकार नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपली प्रकरणे सलोख्याने मिटवावीत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांनी केले आहे.

### अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम

#### अत्याचारात मृत्यू प्रकरणी मृताच्या वारसांना नोकरी देण्याचा निर्णय; जिल्ह्यात ३१ प्रकरणात पात्र वारसांना दस्ताऐवज दाखल करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत दाखल प्रकरणात मृत्यू झाला असल्यास मयताच्या पात्र वारसाला नोकरी देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यासंदर्भातील शासन निर्णय दि.२० नोव्हेंबर रोजी निर्गमित केला आहे. सन २०१२ ते २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील ३१ प्रकरणात मयतांच्या वारसांना नोकरी देण्यासाठी प्रक्रिया सुरु करण्यात आली असून मयताच्या वारसांनी सहायक आयुक्त समाज कल्याण यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. शासन निर्णयानुसार सन २०१२ ते २०२५ याकालावधीतील पिडीत मयतांच्या वारसांना नोकरी देण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकून ३१ प्रकरणात पिडीत व्यक्तिंचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. या ३१ प्रकरणातील मृतांच्या वारसांनी सहायक आयुक्त समाज कल्याण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवाजी हायस्कूल जवळ, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा. शासन निर्णयात नमूद केल्यानुसार परिशिष्ट १ ते ६ मध्ये नमूद दस्तऐवजांसह वारसांनी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व सहायक आयुक्त आर.एम. शिंदे यांनी केले आहे.

# श्रद्धा पांडु लबडे ची राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र हॉकी संघात निवड

**आत्ताच एक्सप्रेस**
**पिपंळवाडी प्रतिनिधि/हारून शेख** / पैठण तालुक्यातील मुधलवाडी गावातील श्रद्धा पांडुरंग लबडे हिने दिनांक ५ ते ७ डिसेंबर रोजी गौतम पब्लिक स्कूल कोळपेवाडी तालुका कोपरगाव येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत भाग घेतला होता ती प्रवरा कन्या विद्या मंदिर या शाळेकडून मुलींचा १४ वर्षे वयोगटात तिचा संघ खेळत होता. या संघाने राज्यात द्वितीय क्रमांकाने विजय मिळून विद्यालयाचे नाव लौकिक केले. कोळपेवाडी येथे झालेल्या राज्यस्तरीय




शालेय हॉकी स्पर्धेत प्रवरा कन्या विद्या मंदिर शाळेतील हॉकी टीमची कर्णधार श्रद्धा लबडे, जानवी वाघमोडे, संस्कृती शेटे, खुशी तुपे, तेजल वाकडे, अमृता गोरे, किरण लवांडे, सई देशमुख, विशाखा महाजन, भक्ती बावणे, दिव्या पांढरे ,दीप्ती आमटे, प्राची पारखे ,वैष्णवी काळे ,शिवानी काळुसे, मानसी देवरे ,शिवानी येडे ,अंकिता होळकर, या सर्वांचा सहभाग होता. विद्यालयातील यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव सौ. चैताली ताई ,आशुतोष दादा काळे ,यांनी ट्रॉफी देऊन खेळाडूंची कौतुक केले. मध्यप्रदेश ग्वालियर येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र हॉकी संघात सध्या संघाचे कर्णधार पद निभावणाऱ्या श्रद्धा लबडे, जानवी वाघमोडे, संस्कृती शेटे , यांची निवड झाली आहे. पैठण तालुक्यातील मुधलवाडी येथील असलेली श्रद्धा लबडे हिने गावाचे नाव लौकिक केल्यामुळे सर्व स्तरात तिचे स्वागताचा वर्षाव होताना दिसत आहे.

# असंघटित कामगारांचा आधारवड हरपला डॉ बाबा आढाव यांना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण.....

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी**/ गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कांदा मार्केट यार्ड मध्ये जेष्ट समाजसेवक डॉ बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली दरम्यान त्यांच्या संपुर्ण जिवनभर

खऱ्या अर्थाने कष्टकरी, श्रमिक, गरीब, वंचित आदी वर्गाकरिता संपूर्ण आयुष्य समर्पित केले. रिक्षा पंचायत, हमाल पंचायत, माथाडी, असंघटित कामगारांच्या प्रसंगात त्यांना कठोर भूमिका घ्यावी लागली. ते विचार घेऊन ते शेवटच्या श्वासापर्यंत आयुष्य जगले. छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती शाहू महाराज महात्मा फुले महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा स्मरणात ठेवून त्या दृष्टीने वाटचाल केली एक संघर्ष योद्धा म्हणून त्यांना भारतासह महाराष्ट्राने




अनुभवले आहे,दरम्यान हमाल ,मापाडी,वंचितासाठी गोरबगरीबांना न्याय मिळवुन देण्यासाठी प्रयत्न केला असे प्रतिपादन बाजार समितीचे सभापती शेषराव नाना जाधव यांनी केला दि १० रोजी दुपारी ३ वाजता ज्येष्ट समाजसेवक डॉ बाबा आढाव यांच्या स्मरणार्थ शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सभापती शेषराव जाधव यांनी डॉ बाबा आढाव यांनी केलेल्या कार्या बद्दल व जिवनावर प्रकाश टाकला समाजसेवक ज्ञानेश्वर वाघचौरे यांनी सांगितले कि डॉ बाबा आढाव यांनी इ व्ही एम विरोधात वयाच्या ९३ वर्षी आदोंलन केले होते यावेळी पत्रकार सौ सपना गायकवाड, लक्ष्मण नरोडे यांनी डॉ बाबा आढाव यांच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकलायावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे ,सचिव संतोष पवार,फकिरचंद पवार प्रमोद बनकर विजय वानखेडे बाबासाहेब दोंदे प्रकाश दाणे संतोष पठारे आदींची उपस्थिती होती सुत्र संचालन गौतम मोकळे यांनी केले व आभार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सुनिल सर्जेराव पाखरे यांनी मानले...

# राष्ट्रीय हस्तशिल्प सप्ताह; एमजीएम विद्यापीठात प्रदर्शन व प्रात्यक्षीक

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ विकास आयुक्त (हस्तशिल्प) कार्यालय, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने ८ ते १४ डिसेंबर या कालावधीत संपूर्ण खुला ठेवण्यात आला असून सकाळी ११ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत प्रदर्शनाला भेट देता येणार आहे. या दोन दिवसीय विपणन आणि प्रात्यक्षिक कार्यक्रमात विविध हस्तकला प्रकारातील कारागिरांनी सहभाग प्रदर्शन केले. तसेच लाखेच्या बांगड्या तयार करणे, धातू डाई बनविणे, क्रोशिया वस्तू बनविणे आणि बंजारा भरतकाम यांसारख्या शिल्पकलेची थेट प्रात्यक्षिकेही सादर केली. स्कूल ऑफ डिझाइनमधील स्कूल ऑफ डिझाइनच्या अधिष्ठाता सुभा महाजन, डॉ. प्राप्ती देशमुख तसेच शिल्पगुरू आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते कारागीर रमाकांत रूपचंद सूर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाविषयीची माहिती हस्तशिल्प सेवा



देशात राष्ट्रीय हस्तशिल्प सप्ताह साजरा केला जात आहे. त्यानुसार हस्तशिल्प सेवा केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी एमजीएम विद्यापीठाच्या सहकार्याने एमजीएम विद्यापीठ परिसरात हस्तशिल्प कारागिरांसाठी दोन दिवसांचे प्रदर्शन आणि प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित केला.

हा कार्यक्रम सर्व कला रसिक, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांसाठी घेत आपली उत्पादने प्रदर्शित केली आणि प्रात्यक्षिकेही सादर केली.

प्रदर्शनात कारागिरांनी बाटिक पेंटिंग, बंजारा भरतकाम, धातू डाई तयार करणे, पितळी शिल्प, क्रोशिया वस्तू, बांबू शिल्प, जरी व भरतकाम, सोलापूरच्या सूती सजावटी वस्तू, टेराकोटा दागिने, लाखेच्या बांगड्या, पैठणी साड्या यांसारख्या विविध वस्तूंचे विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमात सहभाग घेत टेराकोटा व सिरॅमिक मातीची भांडी, हाताने छापलेल्या टी-शर्ट्स, प्रिंट मेकिंग कला आणि इंटेरियर डिझाइनशी संबंधित उत्पादने प्रदर्शित केली.

कार्यक्रमाचे उद्घाटन एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विलास सपकाळ यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाले. यावेळी कुलसचिव डॉ. आशीष गाडेकर, केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथील सहाय्यक संचालक अमनकुमार जैन यांनी दिली.

या कार्यक्रमाचा उद्देश ८ ते १४ डिसेंबर दरम्यान हस्तशिल्प सप्ताह साजरा करणे, महाराष्ट्रातील विविध हस्तकला प्रकारांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सहभागी पारंपरिक हस्तशिल्प कारीगरांच्या कौशल्याचा गौरव करणे हा आहे.

# एकनाथ महाजन यांच्या कडून दिव्यांग विद्यार्थ्याना स्वेटर वाटप ...

**आत्ताच एक्सप्रेस / सोयगाव / प्रतिनिधी** / दिव्यांग सप्ताहानिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय शाळा सोयगाव येथिल दिव्यांग विद्यार्थ्याना ठंडीपासून संरक्षण बचाव व्हावा म्हणून अंध अपंग कल्याणचा,घेतला आहे वसा विकास सर्वांगीण साऱ्यांचा,कोण कोठे असो कसा।। बहिण बंधू आपले सारे, नाते जोडू कायमचे जीवन त्यांचे सुखी कराया, कर सरसावू सहयोगाचे

या वरील उक्ती प्रमाणे प्रशाला सोयगाव येथिल माजी मुख्याध्यापक तथा माजी नगरसेवक,समाजसेवक एकनाथ महाजन सर स्वेटर माजी विद्यार्थी संघाचे ,शालेय व्यवस्थापन समिती सदस्बं हर्षल काळे,राजेंद्र दुतोडे,अण्णाभाऊ वाघ,रविंद्र




साखळे पालक सुधाकर सोहनी याच्या हस्ते बुधवारी (दि .१०) करण्यात आले यावेळी दिव्यांग विद्यार्थ्याच्या चेहर्यावर आनंद दिसुन येत होता यावेळी शाळेतील मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,पदवीधर शिक्षिका सुरेखा चौधरी,पंकज रगडे सहशिक्षिका मंगला बोरसे, सविता पाटील,अकुश काळे,गणेश बाविस्कर,अनिल देसाई,तानाजी जाधव,शुभम देसले,पुनम लाड उपस्थित होते.

# असंघटित कामगारांचा आधारवड हरपला डॉ बाबा आढाव यांना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण.....

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी/ फिरोज मन्सुरी**/ गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कांदा मार्केट यार्ड मध्ये जेष्ट समाजसेवक डॉ बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली दरम्यान त्यांच्या संपुर्ण जिवनभर खऱ्या अर्थाने कष्टकरी, श्रमिक, गरीब, वंचित आदी वर्गाकरिता संपूर्ण आयुष्य समर्पित केले. रिक्षा पंचायत, हमाल पंचायत, माथाडी, असंघटित कामगारांच्या प्रसंगात त्यांना कठोर भूमिका घ्यावी लागली. ते विचार घेऊन ते शेवटच्या श्वासापर्यंत आयुष्य जगले. छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती शाहू महाराज महात्मा फुले महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा स्मरणात ठेवून त्या दृष्टीने वाटचाल केली एक संघर्ष योद्धा म्हणून त्यांना भारतासह महाराष्ट्राने अनुभवले आहे,दरम्यान हमाल ,मापाडी,वंचितासाठी गोरबगरीबांना न्याय मिळवुन देण्यासाठी प्रयत्न केला असे प्रतिपादन बाजार समितीचे सभापती शेषराव नाना जाधव यांनी केला दि १० रोजी दुपारी ३ वाजता ज्येष्ट समाजसेवक डॉ बाबा आढाव यांच्या स्मरणार्थ शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सभापती शेषराव जाधव यांनी डॉ बाबा आढाव यांनी केलेल्या कार्या बद्दल व जिवनावर प्रकाश टाकला समाजसेवक ज्ञानेश्वर वाघचौरे यांनी सांगितले कि डॉ बाबा आढाव यांनी इ व्ही एम विरोधात वयाच्या ९३ वर्षी आदोंलन केले होते यावेळी पत्रकार सौ सपना गायकवाड, लक्ष्मण नरोडे यांनी डॉ बाबा आढाव यांच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकला यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे ,सचिव संतोष पवार,फकिरचंद पवार प्रमोद बनकर विजय वानखेडे बाबासाहेब दोंदे प्रकाश दाणे संतोष पठारे आदींची उपस्थिती होती सुत्र संचालन गौतम मोकळे यांनी केले तर आभार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सुनिल सर्जेराव पाखरे यांनी मानले....

# संस्कार ' च्या विद्यार्थ्यांनी घेतली भूजल सर्वेक्षणाची माहिती

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी)/** जालना येथील संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी भूजल सर्वेक्षण आणि भू विज्ञानाची माहिती जाणून घेतली. यात विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. सहाय्यक भूवैज्ञानिक गिरीधर, डॉ.कृष्णा देशपांडे, विभुते,राहुल भवाळ,राजश्री घाटोळे,गणेश शेळके, शहाजी काष्टे,काळे आदींनी विद्यार्थ्यांना पाणी,भूगर्भा संदर्भात मार्गदर्शन केले. हे




इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेटी तून भूजल सर्वेक्षण आणि भूविज्ञान विभागात जाऊन पाण्याचा स्त्रोत त्याच प्रमाणे जमिनीतील भूगर्भातील १५० फुटापर्यंत चे पाणी माणसास पिण्यास चालते. पाण्याच्या पातळीचे मोजमाप कसे करतात. पिण्याच्या पाण्यात क्षार किती असवा इत्यादी महिति क्षेत्रभेटीचे आयोजन वर्गशिक्षक किरण धुळे,राहुल घोलप यांनी केले होते. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी विजय देशमुख विनायकराव देशपांडे,प्रा. केशरसिंह बगेरिया,भास्करराव काळे, डॉ.दीपक मंत्री,डॉ.जुगल किशोर भाला मुख्याध्यापक ईश्वर वाघ व सुजाण पालक आदींनी कौतुक केले.

# कुक्कडगाव ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार प्रकरण : दोन महिने उलटूनही चौकशी अहवाल नाही; विस्तार अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह




**आत्ताच एक्सप्रेस**
**अंबड तालुका प्रतिनिधी** / अंबड तालुक्यातील कुक्कडगाव ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचारावर दाखल तक्रारीनंतर दोन महिने उलटूनही चौकशी अहवाल न सादर झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. ग्रामविकास मंत्री, ग्रामविकास सचिव, विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून तक्रारी दाखल झाल्यानंतरही तपासात ठोस प्रगती झालेली नाही.

जालना जिल्हा परिषदेने तक्रारीची दखल घेत मुख्याधिकारी मिन्नू पी. एम. यांनी अंबड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना चौकशी आदेश दिले. त्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी तपासाची जबाबदारी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी चव्हाण यांच्याकडे सोपवली. विस्तार अधिकारी चव्हाण यांनी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी जा.क्र. पं.च.अ./पंचा-२/कवि/२०२५ असा अधिकृत पत्रव्यवहार करून तक्रारदार व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना नोटीस बजावली.

यानुसार ९ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयात प्रत्यक्ष हजेरी लावून पंचनामा केला. आवश्यक सर्व दप्तर हस्तगत करून अहवाल लवकरच सादर केला जाईल अशी माहिती तक्रारदारांना देण्यात आली होती.

मात्र दोन महिने उलटूनही चौकशी अहवाल सादर न झाल्याने तक्रारदारांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. वेळोवेळी विचारणा केल्यावर विस्तार अधिकारी चव्हाण दोन दिवसात देतो, चार दिवसात देतो अशा आश्वासनांवरच प्रकरण लांबवत असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

दरम्यान, तपासातील विलंबामुळे दप्तरातील नोंदींमध्ये फेरफार झाल्याची शक्यता तक्रारदारांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रकरण अधिकच संशयास्पद बनले असून ग्रामस्थांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.

चौकशी अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात?

चौकशीचे आदेश असूनही दोन महिने अहवाल न येणे, विलंबित प्रतिसाद, प्रकरणात गती नसणे - या सर्व गोष्टींमुळे विस्तार अधिकारी चव्हाण यांच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**तक्रारदारांचा प्रश्न -**

अहवालाला विलंब का? भ्रष्टाचाराच्या आरोपांना आडोसा देण्याचा प्रयत्न सुरू आहे का? संबंधितांना पाठीशी घातले जात आहे का?

कुक्कडगाव ग्रामपंचायतीतील कथित अनियमितता, निधी गैरव्यवहार, ग्रामसभा न घेणे आदी गंभीर मुद्द्यांवर आधारित तक्रारींची चौकशी अद्याप पूर्ण न झाल्याने संपूर्ण प्रकरण धूसर झाले आहे.

तक्रारदारांनी तात्काळ चौकशी अहवाल जाहीर करण्याची मागणी केली असून, चालढकल प्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# 'लाडकी'साठी निधी जमवताना सरकारची दमछाक; 'सामाजिक न्याय'चा निधी पुन्हा वळवला

**मुंबई/** महायुती सरकारच्या लाडकी बहिण योजनेसाठी पुन्हा एकदा सामाजिक न्याय आणि आदिवासी विभागाचा निधी वळवण्यात आलाय. सातत्याने सामाजिक विभागाचा निधी लाडकी बहिण योजनेसाठी वळवला जात असल्याने याचा सामाजिक न्याय विभागाच्या योजनांवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जातेय.आणि यावरून विरोधकांनी सरकारवर हल्लाबोल केलाय.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना ही महायुती सरकारची महत्वकांक्षी योजना आहे.विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू केलेल्या या योजनेचा महायुतीला मोठा फायदा झाला आणि महायुती सरकार पुन्हा एकदा सत्तेवर विराजमान झालं. मात्र लाडकी बहिण योजनेसाठी कमी पडणारा निधी ही महायुती सरकारसमोरची मोठी डोकेदुखी असल्याचं समोर आलंय. कारण लाडक्या बहिणींच्या हप्त्यासाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाचा निधी पुन्हा एकदा वळवण्यात आलाय.

सामाजिक न्याय विभागाचे ६७१ कोटी ३५ लाख रुपये तर आदिवासी विकास विभागाचे ५४९ कोटी २९ लाख रुपये वळवण्यात आलेत.विधिमंडळात सादर झालेल्या पुरवणी मागण्यांप्रमाणे ही आर्थिक तरतूद मंजूर करण्यात आलीय. याआधीही अशाच प्रकार सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाचा निधी लाडकी बहिणसाठी वळवण्यात आला होता.हा निधी वळवल्यामुळे त्याचा परिणाम सामाजिक न्याय विभागाच्या योजनांवर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येतेय. आणि यावरूनच विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केलाय.

सामाजिक न्याय विभागाचा निधी लाडक्या बहिणींसाठी दिला नाही तर ही योजना अडचणीत येईल त्यामुळे दर महिन्याला हा निधी वळवला जातो असं म्हणत सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी हा निधी वळवल्याचं समर्थन केलंय. मात्र याआधी सामाजिक न्याय विभागाचा निधी लाडकी बहिणसाठी वळवल्यानंतर नाराजी व्यक्त करणाऱ्या सामाजिक न्यायमंत्र्यांची भाषा आता बदलल्याचं पाहायला मिळतंय.




तर लाडकी बहीण योजना ही राज्यातील अत्यंत महत्वपूर्ण ठरलेली योजना आहे. आणि त्यामुळे ही योजना अधिक बळकट करण्यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न सुरू असल्याचं मंत्री पंकज भोयर यांनी म्हटलंय.

महायुती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर सुरू केलेली लाडकी बहिण योजना प्रचंड लोकप्रिय ठरतेय. विधानसभा निवडणुकीत तर या योजनेचा महायुतीला मोठा फायदा झालाच . मात्र आगामी स्थानि स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही याचा मोठा फायदा होण्याचा अंदाज आहे. आणि सरकारकडून लाडक्या बहिणींना खूश करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र त्याच वेळी या योजनेसाठी निधी जमवताना सरकारची मात्र दमछाक सुरू आहे. आणि त्यामुळेच सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाच्या निधीला पुन्हा कात्री लावण्यात आलीय. य़ावरून विरोधकांची सरकारला धारेवर धरलंय.

# प्रचारार्थ जास्त आवाज करणाऱ्या उमेदवारांवर कारवाई करा इमरान खान

## निवडणूक निर्णय अधिकारी व पोलीस निरीक्षक यांच्या कडे केली मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**फुलंब्री/प्रतिनिधी/** नगर पंचायत सार्वत्रिक निवडणुक २०२५ च्या प्रचारार्थ उमेदवारांना प्रचार वाहनांवर टु वे, फोर वे, डिजे, मोठे लाऊड स्पीकर वापरण्याची परवानगी देण्यात येऊ नये तसेच ध्वनी क्षमतेचे नियम मोडणाऱ्या उमेदवारांवर कारवाई करण्याची मागणी इमरान खान यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार योगिता खटावकर व पोलीस निरीक्षक संजय सहाणे यांच्या कडे अर्जान्वये केली आहे.

अर्जात म्हटले आहे की फुलंब्री नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे पुन्हा प्रचार सुरु होत आहे.

प्रचार करिता उमेदवारांना प्रचार वाहनांवर टु वे,फोर वे, डिजे, मोठे स्पीकर लावण्याची परवानगी संबंधित प्रशासना कडुन देण्यात येऊ नये कारण की मोठ्या लाऊडस्पीकर व भोंगे च्या कर्कशा आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, लहान मुलांना मोठा त्रास होत आहे. सध्या परीक्षा सत्र सुरू असल्याने विद्यार्थींना ही अभ्यास करण्यास अडथळा होत आहे तसेच मुख्य मार्केट व शहरातील मुख्य मार्गावर एका मागे एक प्रचार वाहने धिंगाणा घालत फिरत असल्याने सामान्य नागरिक ध्वनी प्रदुषणामुळे वैतागले आहे.

ध्वनी क्षमतेचे नियम मोडुन जास्त आवाजात प्रचार करणाऱ्या उमेदवारांवर नियमा प्रमाणे कारवाई करण्यात यावी तसेच प्रचार दरम्यान आदर्श आचारसंहिता चा पालन करुन ध्वनी प्रदूषण मुळे सामान्य नागरीकांना होणारा त्रास दुर करावा अशी मागणी अर्जान्वये इमरान खान यांनी केली आहे.

# शासकीय भरड धान्य खरेदी केंद्र तात्काळ सुरु करून अतिवृष्टीचे अनुदान वाटप करा , काँग्रेस पक्षाची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**फुलंब्री प्रतिनिधी / सरफराज पटेल /** शासकीय भरड धान्य खरेदी केंद्र तात्काळ सुरु करून अतिवृष्टीचे अनुदान वाटप करावे अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने काल दिनांक ९ डिसेंबर रोजी संबंधित विभागाच्या अधिकार्यांना निवेदन देण्यात आले.



फुलंब्री तालुक्यात मका व कापुस हे पिक मुख्य नगदी पिक म्हणुन शेतकरी घेतात मात्र खासगी व्यापार्याकडुन योग्य भाव मिळत नसुन शासनाने २४०० रुपये प्रति क्विंटल मक्याचा भाव जाहीर केला असुन खरेदी केंद्रावर मात्र खरेदी सुरु केली नसुन खरेदी करीता अनेक अटी लादल्या आहे त्या अटी शिथील करुन फुलंब्री तालुक्यात जास्तीचे खरेदी केंद्र सुरु करावे. तसेच यावर्षी तालुक्यात परतीच्या पावसाने शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्याच्या हाता तोंडाशी आलेला मका सोयाबीन, कापुस फळबाग, भाजीपालाचे मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टीत नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्याचे जे उरले सुरले पिके राहीले होते जसे की, मका सोयाबीन, कापूस हे व्यापारी खूप कमी भावाने खरेदी करीत आहेत. त्यामुळे आणखी ही नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे लवकरात लवकर खरेदी केंद्र सुरु करावे, अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे. दरम्यान, शासनाने दिवाळी पूर्वी नुकसान भरपाईचे अनुदान शेतकऱ्याच्या बैंक खात्यात जमा करु असा मोठा गाजावाजा करून घोषणा केली होती. प्रत्यक्षात मात्र ही शेतकऱ्याची चेष्टा असून शेतकर्याच्या तोंडाला पाने पुसली आहे हे अनुदान तात्काळ द्यावे तसेच मका सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरु करून शेतकर्यांना सहकार्य करावे. अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली. निवेदनावर जगन्नाथ काळे, संतोष मेटे,सुदाम मते,सुभाषराव गायकवाड, लहू मानकापे, सदाशिव विटेकर, बाबुराव डकले,राहुल सोनवणे,इद्रिस पटेल, ज्ञानेश्वर जाधव,शिवराम म्हस्के, सुरेश मुळे, रेखाताई वाहटूळे,अश्विनी जाधव, रवींद्र जंगले, विठ्ठल कोलते, मंगेश मेटे,गणेश पवार, गणेश काळे, पंढरीनाथ जाधव, भाऊसाहेब शिरसागर,संदीप बेडके, नामदेव खेत्रे,विठ्ठलराव डकले,शंकर उबाळे,मुकेश चव्हाण, आजिनाथ भागवत, भागवत काकडे, रवींद्र वाहटूळे, यांच्या सह आदी शेतकरी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# अंबादास दानवेंच्या कॅश बॉम्बनंतर महायुतीत वादाचे फटाके, तटकरेंचा महेंद्र दळवींना खोचक टोला...

**मुंबई/** अंबादास दानवेंनी महेंद्र दळवी यांच्यावर केलेल्या आरोपांनंतर महायुतीमध्येच जुंपल्याचं पाहायला मिळतंय. दानवेंच्या आरोपांनंतर महेंद्र दळवींनी सुनील तटकरेंवर आरोप केले होते. मात्र, आता सुनील तटकरेंनी देखील या वादात उडी घेतली असून महेंद्र दळवींना खोचक टोले लगावले आहेत. अंबादास दानवेंच्या कॅश बॉम्बनंतर महायुतीमध्ये वादाचे फटाके फुटतायत. दानवेंनी ट्विट केलेल्या व्हिडिओनंतर महेंद्र दळवींनी या प्रकरणात सुनील तटकरेंना ओढलं. दरम्यान यानंतर आता सुनील तटकरेंनी देखील महेंद्र दळवींवर पलटवार केलाय. सुनील तटकरेंनी महेंद्र दळवींना खोचक टोले लगावले आहेत. दळवी हे निरागास आणि निष्पाप नेते आहेत, त्यांच्यावर बेछूट आरोप करण्यात आल्यानं या प्रकरणाचा छख- नं तपास करावा अशी मागणी करत तटकरेंनी दळवींना शालजोडे मारले.



महेंद्र दळवी थोर विचारवंत आहेत, त्यांच्यावर केलेले आरोप म्हणजे देशाच्या एकात्मतेवर घाला आहे, असाही टोला तटकरेंनी दळवींना लगावलाय. अंबादास दानवेंनी देखील या प्रकरणाची चौकशी सीबीआय, आयबी आणि रॉकडून करण्यात यावी अशी मागणी करत दळवींना टोले लगावले आहेत.

अंबादास दानवेंनी व्हिडिओ ट्विट करत महेंद्र दळवी यांच्यावर आरोप केलेत. यानंतर या व्हिडिओवर स्पष्टीकरण देत महेंद्र दळवींनी व्हिडिओ मॉर्फ केल्याचा दावा केलाय. दरम्यान यानंतर महेंद्र दळवी यांनी या प्रकरणात अंबादास दानवेंना नोटीस देखील पाठवलीय.

अंबादास दानवेंनी पैशांच्या बंडलासोबतचा एक व्हिडिओ ट्विट करत दळवींना घेरण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुसरीकडे या प्रकरणावरून कोकणातील दोन कट्टर विरोधकांमध्ये जुंपल्याचं पाहायला मिळालं.. महेंद्र दळवींनी या प्रकरणात सुनील तटकरेंचं नाव घेतलं आणि पुन्हा एकदा दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार जुंपली, सुनील तटकरेंनी मजेशीर पद्धतीनं टोले लगावत महेंद्र दळवींचा समाचार घेतला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813